## सिंगापूरचे उप-पंतप्रधान आणि वाणिज्य-उद्योग मंत्र्यांनी घेतली राष्ट्रपतींची भेट

13 ऑगस्ट 2025

महामहिम श्री. गॅन किम यॉंग (उपपंतप्रधान आणि वाणिज्य-उद्योग मंत्री, सिंगापूर) यांच्या नेतृत्वाखालील मंत्रीस्तरीय शिष्टमंडळाने राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती भवन येथे आज (13 ऑगस्ट 2025) भेट घेतली. शिष्टमंडळ हे भारत-सिंगापूर मंत्रीस्तरीय गोलमेज परिषदेच्या (ISMR) तिसऱ्या बैठकीसाठी दाखल झाले होते.

2. राष्ट्रपती भवनात शिष्टमंडळाचे स्वागत करताना राष्ट्रपतींनी नमूद केले की अनिश्चित जागतिक वातावरणातही, भारत-सिंगापूर सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी वर्धित होत आहे. द्विपक्षीय संबंधांच्या प्रस्थापनेच्या 60व्या वर्षपूर्ती निमित्ताने, या वर्षाच्या सुरुवातीला राष्ट्राध्यक्ष थर्मन षणमुगरत्नम यांच्या औपचारिक भारत भेटीचे राष्ट्रपतींनी यावेळी स्मरण केले. ISMR सह उच्च स्तरावरील अशा नियमित संवादांमुळे आपल्या बहुआयामी संबंधांना निरंतर गती मिळेल, असेही राष्ट्रपती म्हणाल्या.

3. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भयंकर हल्ल्यानंतर दहशतवादाविरुद्ध सिंगापूरने घेतलेल्या कडक भूमिकेचे राष्ट्रपतींनी कौतुक केले.

4. भारताचे 'ॲक्ट ईस्ट' धोरण, महासागर व्हिजन आणि इंडो-पॅसिफिक व्हिजन मध्ये सिंगापूर हा महत्वपूर्ण भागीदार असल्याचे राष्ट्रपतींनी यावेळी बोलताना नमूद केले. व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, संस्कृती, शिक्षण आणि नागरिक परस्पर आदान-प्रदान या क्षेत्रात उभय राष्ट्रांची दृढ भागीदारी राहिली आहे. कौशल्य, हरित अर्थव्यवस्था आणि फिनटेक यासारख्या सहकार्याच्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये भागीदारीचा होत असलेला विस्तार ही समाधानाची बाब असल्याचे राष्ट्रपतींनी नमूद केलं.

**नवी दिल्ली**

13 ऑगस्ट 2025